## मराठी लघुलेखन प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम

मराठी लघुलेखन प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा आहे. या कालावधीनंतर प्रशिक्षार्थ्यांने (एतदर्थ मंडळाची) १०० शब्द प्रती मिनिटाची मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे. या परीक्षेत उमेदवारास १०० शब्द प्रती मिनिटाच्या गतीने उतारे वाचून दाखविले जातात आणि उमेदवाराने त्याचे लिप्यंतर १ तास ४५ मिनिटांत ५४ करावयाचे असते. वरील दोन उताऱ्यांपैकी पहिला उतारा साध्या वर्णनात्मक भाषणाचा व दुसरा व्यावसायिक स्वरूपाचा अथवा कार्यालयीन पत्राचा असतो. दोन उताऱ्यांच्या दरम्यान दोन मिनिटांची विश्रांती असते. या परीक्षेत शब्द मोजताना ते छापल्याप्रमाणे न मोजता मूळ शब्दाला जोडून येणारे विभक्ति प्रत्यय किंवा अव्यये स्वतंत्र मोजली जातात. तसेच, सामासिक शब्दांच्या बाबतीत त्या सामासिक शब्दाची फोड केल्यानंतर त्यातून जितके मूळ शब्द निघतील तितके स्वतंत्र शब्द मोजण्यात येतील.

२. एक वर्षाच्या प्रशिक्षणाच्या शेवटी वरीलप्रमाणे १०० शब्द प्रती मिनिटाची परीक्षा उत्तीर्ण व्हावयाची म्हणजे प्रशिक्षार्थ्यांने प्रशिक्षणातील किमान ११० शब्द प्रती मिनिटाची तरी गती प्राप्त केली पाहिजे. त्या दृष्टीने अभ्यासक्रमाची परिपूर्ती पुढीलप्रमाणे होणे आवश्यक आहे.

३. प्रशिक्षण भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या "मराठी लघुलेखन" या पुस्तकातील मराठी लघुलेखन प्रणालीप्रमाणेच दिले पाहिजे. या पुस्तकातील पाठ पुढे दर्शविल्याप्रमाणे पूर्ण करावयाचे आहेत :—

| | | |
|---|---|---|
| पहिला महिना | .. | .. पाठ १ ते ४. |
| दुसरा महिना | .. | .. पाठ ५ ते ८. |
| तिसरा महिना | .. | .. पाठ ९ ते १२. |
| चौथा महिना | .. | .. पाठ १३ ते १६. |
| पाचवा महिना | | पाठ १७ ते २१ |
| सहावा महिना | | पाठ २२ ते २५. |
| सातवा महिना | .. | .. पाठ २६ ते २८. |
| आठवा महिना | .. | .. पाठ २९ (अभ्यास ९५ ते १०४). |
| नववा महिना | .. | .. पाठ २९ (अभ्यास १०५ ते ११४). |
| दहावा महिना | .. | .. पाठ २९ (अभ्यास ११५ ते ११८) व पाठ ३० |
| अकरावा महिना | .. | .. मागील सर्वसाधारण उजळणी व बाहेरील उतारे. |
| बारावा महिना | .. | .. बाहेरील उतारे. |

४. कोणत्या महिन्यात कोणते व किती पाठ करावेत हे वर दर्शविले असले तरी त्या पाठांबरोबरच आवश्यकतेनुसार प्रत्येक महिन्यात मागील पाठांची उजळणीही अभिप्रेत आहे. प्रशिक्षणाचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांना श्रुतलेखन साधारणपणे पुढील गतीने द्यावे :—

| | | |
|---|---|---|
| (१) सातव्या महिन्यात | .. | ६० शब्द प्रति मिनिट. |
| (२) आठव्या महिन्यात | .. | ७० शब्द प्रति मिनिट. |
| (३) नवव्या महिन्यात | .. | ८० शब्द प्रति मिनिट. |
| (४) दहाव्या महिन्यात | .. | ९० शब्द प्रति मिनिट. |
| (५) अकराव्या महिन्यात | .. | १०० शब्द प्रति मिनिट. |
| (६) बाराव्या महिन्यात | .. | ११० शब्द प्रति मिनिट. |

५. पहिले सहा महिने प्रशिक्षार्थ्यांच्या प्रगतीबाबतची नोंद निदेशकाने स्वमतानुसार करावी. सातव्या महिन्यापासून परीक्षा घेण्यास सुरुवात करून परीक्षेत मिळणाऱ्या गुणानुसार प्रगतीची नोंद करण्यात यावी. ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त करणाऱ्या प्रशिक्षार्थींचा प्रगती असमाधानकारक असल्याची नोंद करावी. त्यापुढे पुढीलप्रमाणे प्रगतीची नोंद करावी:—

| | |
|---|---|
| ४० ते ४९ टक्के गुण | .. साधारण. |
| ५० ते ५९ टक्के गुण | .. समाधानकारक. |
| ६० ते ६९ टक्के गुण | .. चांगली. |
| ७० ते ७९ टक्के गुण | .. फार चांगली. |
| ८० टक्के किंवा त्यापुढे | .. उत्तम. |

## एतदर्थ मंडळ मराठी लघुलेखन परीक्षा

### प्रति मिनिटास शंभर शब्दांच्या लघुलेखन परीक्षेचा अभ्यासक्रम

(एकूण गुण—१००)

वृत्त निवेदन शैलीने सांगण्यात आलेले खालील नमूद केल्याप्रमाणे दोन उताऱ्यांचे आठ मिनिटे लघुलेखन घेणे :—

(१) साध्या वर्णनात्मक भाषणाचा उतारा, आणि

(२) व्यावसायिक स्वरूपाच्या पत्राचा अथवा कार्यालयीन पत्राचा उतारा.

प्रत्येक उतारा चार मिनिटे सांगण्यात येईल. दोन उताऱ्यांच्या दरम्यान दोन मिनिटांची विश्रांती राहील.

हस्तलिखित लिप्यंतरासाठी प्रति मिनिटास ७ शब्द या हिशोबाने १ तास ५४ मिनिटे देण्यात येतील व टंकलिखित लिप्यंतरासाठी प्रति मिनिटास १२ शब्द या हिशोबाने १ तास ७ मिनिटे देण्यात येतील.

टीप.—एखाद्या मंत्र्याने अगर लोकसभेच्या सभासदाने लोकसभेत करावयाच्या भाषणाप्रमाणे वृत्त निवेदनाचे स्वरूप राहील. पत्र लेखनाचा मसुदा, लोककर्म विभागाने विकास गटातील एखादे काम कंत्राटदाराकडे द्यावयासंबंधी, परदेशी हुंडणावळ व्यापारासंबंधी लोखंड व पोलाद नियंत्रकाने लिहावयाच्या लोखंड व पोलाद पुरवठ्यासंबंधी अगर संचालक, मुद्रण व लेखन सामग्री यांनी लिहावयाच्या लेखन सामग्रीच्या पुरवठ्यासंबंधीच्या पत्रांच्या स्वरूपात राहील.

वर नमूद केलेल्या दोन्ही उताऱ्यांमध्ये आकड्यांचा अगर नावांचा वाजवीपेक्षा जास्त अंतर्भाव असणार नाही.

शब्द मोजतांना मूळ शब्दाला जोडून येणारे विभक्तिप्रत्यय किंवा अव्यये स्वतंत्र मोजण्यात येतील. तसेच सामासिक शब्दांच्या बाबतीत, त्या सामासिक शब्दांची फोड केल्यानंतर त्यातून जितके मूळ शब्द निघतील तितके स्वतंत्र शब्द मोजण्यात येतील. उदा. अनुक्रमे घरावर, तुरुंगाधिकारी या शब्दांचे प्रत्येकी दोन शब्द होतील. वरील पद्धतीने शब्द मोजल्यानंतर परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता लघुलेखनाची प्रति मिनिट गती कमीत कमी १०० असावी लागेल.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS